## <u>निशाणी क्र.५ खालील आदेश</u>

(अधिघोषीत दि.०६ जुन २०२४)

अर्जदाराने प्रस्तुतची मागणी निशाणी क्र.५ खाली महिलांचे घरगुती हिंसाचारापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ अन्वये शपथपत्र दाखल करून केलेली आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> –**

**०२.** अर्जदार क्र.१ यांचे लग्न गैरअर्जदार क्र.१ यांच्यासोबत दि.२८/०४/२०१२ रोजी स्वामी विवेकानंद सभागृह, राजुरा, ता. राजुरा येथे रितीरिवाजानुसार झाले असुन, आजतागायत त्यांच्यातील लग्नसंबंध कायम आहेत. गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ चे पती असून गैरअर्जदार क्र.२ सासु आहे. सदर लग्नसंबंधातून त्यांना अर्जदार क्र.२ श्लोक हा मुलगा आहे.

**०३.** अर्जदार हिचे कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ सोबल लग्न जोडतेवेळी गैरअर्जदार क्र.१ यांचे वडील गंगाधर हरीभाऊ चिंचाळकर यांनी ''त्यांना तीन मुले असून दोन नौकरीवर आहेत व ते बाहेरगावी राहतात. गैरअर्जदार क्र.१ हा खाजगी नौकरी करत असून, त्याला दरमहा रू.२०,०००/– वेतन मिळत असून, राजुरा येथे असलेले पाच रूमचे घर, शेती व परावर्तीत प्लॉट्स गैरअर्जदार क्र.१ चे वडील यांनी त्यांचे नावाने घेऊन ठेवलेले आहेत व ते गैरअर्जदार क्र.१ लाच देणार आहे, गैरअर्जदार क्र.१ यांना कोणतेही व्यसन नाही'' असे सांगितल्यामुळे अर्जदार क्र.१ यांनी गैरअर्जदार क्र.१ समवेत लग्न करण्याची संमती दर्शविली.

**०४.** अर्जदार क्र.१ यांचे पुढील कथनानुसार, लग्नानंतर ८–१० दिवसानंतर अर्जदार क्र.१ यांना गैरअर्जदार क्र.१ ला दारू पिण्याचे व्यसन असल्याचे व ते कुठलेही काम करत नसल्याचे कळाले. सदरबाबत त्यांनी गैरअर्जदार क्र.२ व त्यांचे मयत सासरे गंगाधर यांना विचारणा केली असता, त्यांनी ''आम्ही आहोत, आम्ही तुझे व तुझे नव–याचे पालन पोषण करणार आहो व जे घर, शेती, प्लॉट्स आहेत ते उद्या तुमचेच आहे, आता तु काही करू शकत नाही'' असे म्हणाले.

**०५.** अर्जदार क्र.१ यांनी पुढे कथन केलेले आहे की, त्यांनी गैरअर्जदार क्र.१ यांना घरखर्चाकरीता पैसे मागितले असता, ते देत नव्हते व त्यांच्या आई वडीलांना जाऊन माग,

त्यांचे सांगण्यावरून त्यांनी अर्जदार क्र.१ समवेत लग्न केले असे म्हणून अर्जदाराशी भांडण करून मारहाण करायचे. सदर कालावधीमध्ये त्यांनी दि.२५/११/२०१३ रोजी अर्जदार क्र.२ यांना जन्म दिल्याचे नमूद केलेले आहे.

**०६.** अर्जदार क्र.१ यांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ हे दररोज दारू पिऊन घरी येत असून अश्लील शब्दांत शिवीगाळ करून गैरअर्जदार क्र.२ व त्यांचे मयत सासरे यांच्या समोर अर्जदार क्र.१ यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करायचे. तसेच गैरअर्जदार क्र.२ व त्यांचे मयत सासरे हे गैरअर्जदार क्र.१ यांना अर्जदार क्र.१ हिला मारहाण करण्याकरीता प्रोत्साहित करत होते. तसेच अर्जदार क्र.१ या कुठे कामाला गेल्या असता, गैरअर्जदार क्र.१ हे त्यांच्या मागे जाऊन रस्त्यावर लोकांसमोर अश्लील शिवीगाळ करून मारहाण करीत असल्याचे तिने नमूद केलेले आहे. तसेच त्यांनी अर्जदार क्र.२ यांला चांगल्या शाळेत प्रवेश घेण्याकरीता म्हटले असता, गैरअर्जदार क्र.२ व मयत गंगाधर यांनी विरोध केला व त्याला राजुरा नगर परिषदेच्या शाळेमध्ये घातले असल्याचे तिने नमूद केलेले आहे. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ यांना शारिरीक व मानसिक त्रास देत होते, परंतु, गैरअर्जदार क्र.१ यांच्या वागणुकीमध्ये भविष्यात बदल होईल या आशेवर त्या संसार करीत होत्या.

**०७.** अर्जदार क्र.१ च्या पुढील कथनानुसार, मार्च २०१८ मध्ये गैरअर्जदारांनी त्यांना शारिरीक व मानसिक त्रास देऊन अर्जदार क्र.२ याला बळजबरीने त्यांच्याकडे ठेऊन घेतले व अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर काढून दिले. त्यामुळे त्या त्यांचे माहेरी लक्कडकोट येथे राहत होत्या. त्यांच्या आईची आर्थीक परिस्थिती ठिक नसल्यामुळे अर्जदार क्र.१ या नागपूर येथे दुकानात नौकरी करून जजीवन जगत होत्या. अर्जदार क्र.१ या डिसेंबर २०२० मध्ये त्यांच्या मुलाला भेटण्यास गेल्या असता, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.२ याला तिचे सोबत पाठविल्याचे तिने नमूद केलेले आहे. त्यावेळी अर्जदार क्र.२ याने गैरअर्जदार हे त्याचेकडे लक्ष देत नसल्याचे व गैरअर्जदार क्र.१ हे नेहमी त्याला मारहाण करत असल्याचे तिला सांगितल्याचे तिने नमूद केलेले आहे.

**०८.** अर्जदार क्र.१ यांचे पुढील कथनानुसार, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ व तिचे आईसोबत खोटे बोलून व त्यांना फसवून गैरअर्जदार क्र.१ चे लग्न तिचेसमवेत करून दिले व त्यांचे आयुष्य खराब केले. तसेच त्यानंतर त्यांच्यावर आर्थीक, सामाजिक, भावनिक हिंसाचार

करून तिला घराबाहेर हाकलुन दिले. सबब, दि.३१/०३/२०२१ रोजी अर्जदार क्र.१ यांनी गैरअर्जदार व मयत गंगाधर यांचेविरूद्ध पोलीस स्टेशन राजुरा येथे भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ सहकलम ३४ अन्वये तक्रार दाखल केली.

**०९.** अर्जदार क्र.१ यांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ यांचा अतिशय निर्दयी, क्रुर व अमानुषपणे छळ करून त्यांच्यावर कौटुंबीक, मानसिक, सामाजीक व आर्थिक हिंसाचार केला. त्यामुळे त्या अर्जदार क्र.२ यांचेसह त्यांचे माहेरी राहत होत्या. परंतु, अर्जदार क्र.२ हा ईयत्ता दुसरी मध्ये राजुरा येथे शिक्षण घेत असल्यामुळे तिला नाईलाजास्तव राजुरा येथे किरायाने रहावे लागत आहे. सदर किरायाचे खोलीचा किराया रू.४०००/– असून व त्यांचे पालनपोषणाचा संपुर्ण खर्च हा अर्जदार क्र.१ ची आई करत आहे. गैरअर्जदार क्र.१ हे त्यांचे किरायाचे घरीदेखील दारूचे सेवन करून येतात व अश्लील शिवीगाळ करून त्रास देतात.

**१०.** गैरअर्जदारांचे उत्पन्न दाखवण्याकामी अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांकडे एकत्र कुटुंबाचे मौजा राजुरा येथे स्लॅपचे घर असून सदर घरी किरायेदार आहेत व त्यापासून त्यांना दरमहा रू.२०,०००/– किराया मिळतो. गैरअर्जदारांकडे शेती, परावर्तीत प्लॉटदेखील आहेत. गैरअर्जदार क्र.१ हे खाजगी काम करून दरमहा रू.१५,०००/– चे उत्पन्न मिळवितात असे त्यांनी नमूद केलेले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ अन्वये दाखल केलेल्या मालमत्ता व दायीत्वाच्या शपथपत्रानुसार देखील गैरअर्जदार क्र.१ चे मासीक उत्पन्न रक्कम रू.३५,०००/– असल्याचे तिने नमुद केलेले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ वर त्यांचेव्यतिरीक्त ईतर कोणाचीही जबाबदारी नसल्याचे तिचे कथन आहे. उपरोक्त परिस्थीतीत तिचा सदरचा अर्ज मंजूर होण्याची तिने विनंती केलेली आहे.

**<u>गैरअर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> –**

**११.** गैरअर्जदारांनी निशाणी क्र.१० अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाल्याचे मान्य केलेले असुन या व्यतिरीक्त त्यांनी अर्जदाराची संपुर्ण कथने नामंजुर असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांच्या विशेष कथनानुसार, अर्जदार क्र.१ या लग्न झाल्यानंतर साधारण दोन वर्ष चांगल्या नांदल्या. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदार क्र.१ यांना संगणक, ब्युटी पार्लर व रांगोळी काढण्याचे शिक्षण दिले व तिचे पुढील खर्चाकरीता रू.२,००,०००/– तिचे नावावर टाकले. त्यांच्या

मुलाला शिक्षणाकरीता कॉन्व्हेंट मध्ये टाकले असता, अर्जदार क्र.१ यांनी त्याला तेथून काढून टाकले व न सांगता माहेरी निघून गेल्या. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ यांच्या वडीलांनी अर्जदार क्र.१ ला समजाऊन राजुरा येथे परत आणले असता, काही दिवसांनी पुन्हा न सांगता मुलाला ठेऊन नागपूर येथे निघून गेल्या व तेथे दोन वर्ष राहिल्या असल्याचे त्यांचे कथन आहे. नगर परिषद, राजुरा ही शाळा गैरअर्जदारांच्या घराजवळ असल्याने येणे जाणे करण्याच्या दृष्टीने त्यांनी गैरअर्जदार क्र.१ च्या मुलाला तेथे शिकण्यास टाकले. परंतु, अर्जदार क्र.१ या नागपूर येथून आल्या व त्यांनी न सांगता मुलाला शाळेतून काढले व मुलासह तिचे बहिणीचे घराजवळ किरायाने घर घेऊन राहत असल्याचे व दुकानात काम करून दरमहा रू.१५,०००/– उत्पन्न मिळवत असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. त्यानंतर अर्जदार क्र.१ या मुलासह तिचे आईकडे लक्कडकोट येथे स्वेच्छेने राहत असून सद्या त्या कुठे राहतात हे त्यांना माहित नसल्याचे गैरअर्जदारांचे कथन आहे.

**१२.** गैरअर्जदार क्र.१ ने त्यांच्या उत्पन्नाबाबतची कथनेदेखील नाकारलेली आहेत. ते मोलमजुरी करतात. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या पालन पोषणाची जबाबदारी असून, त्यांच्या आईला बी.पी., शुगर व ईतर आजारांचा त्रास असून त्यांच्या औषधोपचाराचा खर्च दरमहा रू.२०,०००/– येत असल्याचे त्यांनी नमुद केलेले आहे. त्यामुळे ते अर्जदाराला कोणत्याही प्रकारची पोटगी किंवा नुकसान भरपाई देण्यास असमर्थ असल्याचे त्यांचे कथन आहे. तसेच अर्जदार क्र.१ ही दुकानात काम करून दरमहा रू.२०,०००/– चे उत्पन्न मिळवित असून त्या त्यांचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ असल्याचे त्यांचे कथन आहे व त्या स्वेच्छेने वेगळ्या राहत असल्यामुळे तिला वेगळा किराया देण्याची बाब त्यांनी अमान्य केलेली आहे. तसेच त्यांच्याकडे कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता नसल्याचे त्यांनी नमूद करून राजुरा येथे त्यांच्या वडीलांचे दोन खोल्याचे घर असून त्यामध्ये तीन भावंडांचे हिस्से असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे अर्जदाराने केलेली अंतरिम पोटगीची मागणी फेटाळून लावण्याची विनंती गैरअर्जदारांनी केलेली आहे.

**१३.** गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र दाखल केलेले नाही.

**१४.** अर्जातील कथन व गैरअर्जदारांचे म्हणणे तसेच युक्तिवाद लक्षात घेता खालील

मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झालेले असून त्याबाबतचे निष्कर्ष प्रस्तुत मुद्यासमोर नमुद करुन त्याबाबतची कारणमिमांसा खाली देत आहे.

| **अनु क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार प्रथमदर्शनी त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब शाबीत करतात काय ? | **होय** |
| ०२. | अर्जदार अंतरिम पोटगीसाठी रक्कम रुपये पंधरा हजार मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **अंशतः होय** |
| ०३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. ०१ करीता</u>–**

**१५.** प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ अन्वये मागणी केलेली आहे. प्रस्तुत कायद्याचे मुळ तत्व अथवा उद्देश लक्षात घेता पिडीत महिलेला त्वरीत न्याय मिळावा याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने केवळ प्रथमदर्शनी हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने शाबीत करणे अपेक्षीत असते. अर्जदाराने शपथेवर दिलेला तोंडी पुरावा देखील त्याकरीता पुरेसा असतो.

**१६.** अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना त्यांचे लग्न दि.२८/०४/२०१२ रोजी झाल्याची बाब मान्य आहे. अर्जदार क्र.१ ने शपथेवर कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांच्याशी त्यांचे लग्न खोटे बोलुन करून देण्यात आले असून, गैरअर्जदार क्र.१ यांना दारूचे व्यसन असल्यामुळे ते नेहमी दारूचे सेवन करून येत होते. तसेच गैरअर्जदार क्र.१ ला घर खर्चाकरीता पैशांची मागणी केली असता, ते त्यांच्या आई, वडीलांना जाऊन माग असे म्हणून ''त्यांचे सांगण्यावरून तुझ्यासोबत लग्न केले'' असे म्हणायचे व त्यांच्याशी भांडण करून मारहाण करायचे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.२ व त्यांचे सासरे हेदेखील गैरअर्जदार क्र.१ यांना अर्जदार क्र.१ हिला मारहाण करण्याकरीता प्रवृत्त करीत होते. तसेच मार्च २०१८ मध्ये अर्जदार क्र.२ याला जबरीने ठेऊन अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर काढून दिल्याचे त्यांचे कथन आहे. तसेच

काही दिवस त्या नागपूर येथे काम करून जगत असल्याचे व सद्या परिस्थितीत त्या अर्जदार क्र.२ समवेत किरायाने राजुरा येथे राहत असल्याचे व त्यांचा संपुर्ण खर्च त्यांची आई करत असल्याचे त्यांचे कथन आहे. उपरोक्त परिस्थितीत अर्जदाराने शपथेवर केलेल्या सदर विधानांवरून प्रथमदर्शनी तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार झाल्याची बाब निदर्शनास येते. सबब, मुद्दा क्र. ०१ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र २ करिता –</u>**

**१७.** अर्जदार क्र.१ ने स्वतः अंतरिम मागणी अंतर्गत दरमहा पोटगी कामी रू.१५,०००/– ची मागणी केलेली असुन, तिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ वर त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबून नसल्याचे तिचे कथन केलेल आहे. तसेच तिने तिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र व प्रस्तुत अर्जातील केलेली कथने जशीच्या तशी गृहित धरली आणि अर्जदार क्र.१ यांनी गैरअर्जदार क्र.१ दरमहा रू.३५,०००/– उत्पन्न मिळवत असल्याचे कथन केले असले तरी तसा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे अर्जात तो मजुरी काम करत असल्याचे व त्याचेवर त्याच्या वयोवृद्ध आईची जबाबदारी असल्याचे नमुद केले आहे. तसेच तो मिळेल ते मजुरीचे काम करत असल्याचे नमुद केलेले आहे.

**१८.** गैरअर्जदाराचे निशाणी क्र.११ वरील म्हणणे दाखल करतेवेळी त्याने अर्जदार क्र.१ ही स्वेच्छेने माहेरी निघुन गेल्याचे नमुद केले असले तरी, त्याच्या कथनाला पुष्टी देणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच गैरअर्जदार क्र.२ यांची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ वर असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ च्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.२ यांच्या पालन पोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ वर असल्याचे त्याने शपथपुर्वक मान्य केलेले आहे. परंतु पती व वडील या नात्याने अर्जदार क्र.१ व २ यांचे पालनपोषणाची प्राथमीक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न हे पोटगीची रक्कम देतेवेळी लक्षात घेणे योग्य व न्यायोचित ठरेल. त्याचप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांना अर्जदार क्र.१ व २ हे गैरअर्जदारांसोबर राहत नसल्याचे मान्य असून त्या स्वेच्छेने त्यांच्या माहेरी राहत असल्याचे अर्जातील कथनांवरून दिसून येते. अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मुलभुत गरजा असून ज्यावेळी गैरअर्जदार क्र.१ ला नातेसंबंध मान्य आहे, त्यावेळी पती व वडील या नात्याने अर्जदारास मुलभुत गरजा पुरवीणे त्यांची नैतीक व कायदेशिर जबाबदारी आहे. सबब,

अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

**१९.** उपरोक्त परिस्थितीत, अर्जदार क्र.१ ने केलेली कथने अधीक ग्राह्य धरून पोटगीची रक्कम ठरवीतेवेळी गैरअर्जदार क्र.१ याचे झालेले शिक्षण गृहीत धरून, तसेच एक सामान्य शारिरीक क्षमतेचा व्यक्ती दरमहा मोलमजुरी करुन नऊ हजार रुपये पर्यंत कमवू शकत असल्याचे माझे मत आहे. तसेच त्याचेवर अवलंबुन असलेले कुटुंबातील ईतर सदस्य यांचा विचार करता व सद्याच्या महागाईच्या काळात प्राथमिक गरजांच्या पुर्ततेसाठी गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम पोटगीसाठी दरमहा रक्कम रुपये २०००/– दरमहा एकत्रीतरित्या मिळण्यास पात्र असल्याचे नमुद करुन अर्जदारांचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब मुद्द क्र. २ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवत आहे. वरील कारणेमिमांसेकरिता मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारित करत आहे.

## आदेश

१ अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२ गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदारांना रक्कम रुपये २०००/– (दोन हजार रुपये) दरमहा पोटगीसाठी एकत्रीतरित्या अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. ०७/०१/२०२२ ते प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपावेतो द्यावे असे आदेशीत करण्यात येते.

३ गैरअर्जदारांनी अर्जदारांवर यापुढे कोणत्याही प्रकारचा कौटुंबीक हिंसाचार करू नये असे आदेशीत करण्यात येते.

NIKHIL LAXMAN HEMNE
Digitally signed by NIKHIL LAXMAN HEMNE
Date: 2024.06.06 16:39:29 +0530

**(निखील ल. हेमणे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट क्र.२), राजुरा

स्थळ – राजुरा
दिनांक – ०६/०६/२०२४